# ड-झोन कबड्डी स्पर्धेत बहिर्जी महाविद्यालयाचा पुरुष संघ विजेता

**(11/09/2026)**






# ड-झोन कबड्डी स्पर्धेत बहिर्जी महाविद्यालयाचा पुरुष संघ विजेता

**(11/09/2026)**





# ड-झोन कबड्डी स्पर्धेत बहिर्जी महाविद्यालयाचा पुरुष संघ विजेता

(11/09/2026)






# ड-झोन कबड्डी स्पर्धेत बहिर्जी महाविद्यालयाचा पुरुष संघ विजेता

**(11/09/2026)**

**ड-झोन कबड्डी स्पर्धेत बहिर्जी महाविद्यालयाचा पुरुष संघ विजेता**

**उत्कृष्ट सांघिक खेळाच्या जोरावर बहिर्जीच्या संघाचे दमदार यश**

वसमत, प्रतिनिधी :स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व नारायणराव वाघमारे महाविद्यालय बाळापुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन ड-झोन कबड्डी स्पर्धेत बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतच्या पुरुष संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.

**अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत बहिर्जी महाविद्यालयाच्या कृष्ण झटे, प्रदीप जाधव, चैतन्य पवळे, रुद्र लोखंडे याच्या उत्कृष्ठ चढाया व  ओमकार कोल्पेकर, मुंजाजी नरवाडे, समीर पठाण यांच्या उत्कृष्ठ पकडीची साथ मिळाली. सर्व खेळाडूंनी आक्रमकता, बचावातील कौशल्य, शिस्त आणि उत्कृष्ट समन्वयाचे दर्शन घडविले. प्रतिस्पर्धी संघांविरुद्ध प्रभावी खेळ करत बहिर्जीच्या संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. खेळाडूंच्या जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासामुळे हे यश संपादन करण्यात आले.**

विजयी संघाला क्रीडा संचालक प्रा. निरंजन अकमार, डॉ. नवनाथ लोखंडे,डॉ. नागनाथ गजमल,प्रा. अनिल नादरे,यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनासोबतच खेळाडूंनी केलेल्या सातत्यपूर्ण सरावामुळे संघाने ही उल्लेखनीय कामगिरी केली.

या यशाबद्दल बहिर्जी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. जयप्रकाशजी दांडेगावकर, उपाध्यक्ष ॲड. मुजाजीराव जाधव, सचिव पंडितरावजी देशमुख, सहसचिव नितीन महागावकर, प्राचार्य डॉ. मा. मा. जाधव, उपप्राचार्य डॉ. सुभाष क्षिरसागर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. नरसिंग पिंपरणे, तसेच प्रा. अनिल नादरे, प्रबंधक डॉ. पांडुरंग बर्वे,व लघुलेखक बालाजी निकम प्रसिद्धी प्रमुख अनिल पंडित यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघातील खेळाडू व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

बहिर्जी स्मारक महाविद्यालयाच्या पुरुष कबड्डी संघाच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली असून, या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.